मौजे चाबुकस्वारवाडी, ता.मिरज, जि.सांगली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे सलगरे, ता.मिरज, जि.सांगली येथे स्थलांतरीत करणे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्थलांतर-२०१३/प्र.क्र.३८९/आरोग्य-४,
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीख: १३ मार्च, २०१८.

<u>वाचा</u>

1. **शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३, दि. १७.११.२०१३,**
2. **आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र:संआसे/कक्ष-७अ/टे-७/प्रा.आ.केंद्र/स्थलांतर /जळगांव/२०१६/२९०४-०८, दि. ७.०९.२०१६.**

<u>प्रस्तावना</u>

मौजे चाबुकस्वारवाडी, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी दि. १७.११.२०१३ च्या शासन निर्णयान्वये नव्याने मंजूर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे सलगरे, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी स्थलांतरीत करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. याशिवाय, जिल्हा परिषद सांगलीच्या सर्वसाधारण सभेने दि. ३०.०७.२०१४ च्या बैठकीत, तसेच, मिरज पंचायत समितीने दि. ११.०३.२०१३ ची मासिक सभेत, मौजे चाबुकस्वारवाडी, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी नव्याने मंजूर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे सलगरे, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबतच्या ठरावास मंजूरी दिली आहे. त्यानुसार, मौजे चाबुकस्वारवाडी, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी नव्याने मंजूर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे सलगरे, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>

मौजे चाबुकस्वारवाडी, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी नव्याने मंजूर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे सलगरे, ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी सुरू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी विहित पध्दतीने जागा अधिग्रहित करून या जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यात येईल. तसेच, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक ती पदनिर्मिती व निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१२५३२४१९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.13 12:41:47 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
आयुक्त, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने), मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे,
उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर,
जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली,
जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली,
मुख्याधिकारी, नगर परिषद सांगली, सांगली,
सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग,
निवडनस्ती (आरोग्य- ४).